दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**वृत्तविशेष क्र.**358

## साबे गावातील १५ अनधिकृत रूमचे बांधकाम जमीनदोस्त

## ठाणे महापालिकेची धडक कारवाई

**ठाणे**(25):दिवा येथील साबे गावातील डीजे कॉम्प्लेक्स येथील कांदळवन हटवून सुनील यादव यांनी अनधिकृतपणे बांधलेल्या १५ रूमचे आरसीसी बांधकाम आज जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त करण्यात आले. ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्यावतीने ही धडक कारवाई करण्यात आली.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले,हातगाड्यांवर कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी दिल्यानंतर अतिक्रमण विरोधी पथकामार्फत मुंब्रा प्रभाग समितीक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, स्टॉलवर धडक कारवाई करण्यात येत आहे.

आज दिवा परिसरातील कारवाई दरम्यान दिवा येथील साबे गाव येथे सुनील यादव यांचे अनधिकृतपणे बांधलेल्या १५ रूम आज जेसीबीने तोडण्यात आल्या.सदरची कारवाई मुंब्रा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांनी केली असून यापुढेही अनधिकृत बांधकामे, फेरीवाले,हातगाड्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.